Vol 6 Issue 5 June 2016
ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 5 | June - 2016

Indian Streams Research Journal

# कथा साहित्यप्रकाराच्या अध्यापनचे महत्त्व

प्रा.डॉ.मारोती बालासाहेब भोसले
मराठी विभागप्रमुख, स्वा.सै.सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा. (जं.) जि. परभणी , (महाराष्ट्र)



**प्रस्तावना :—**

सर्वप्रथाम कथेच्या अध्यापनाच्या उद्यिष्टांचा विचार करू, कथेचे आकलन, आस्वाद व मूल्यमापन आणि त्याचे शब्दांकन यासाठी विद्यार्थ्याला सक्षम बनवणे अध्यापनाचे दद्यिष्टे असावे असे स्थूल मानाने म्हणता येईल. कथेच्या वाचानासाठी विद्यार्थ्यांच्या अंगी, साहित्यिक ज्ञान क्षमता, निर्माण करणे, कथेचे सृजनशील वाचन म्हणजे काय? व ते कसे करायचे याची जाणीव निर्माण करणे, कथेच्या मूल्यामापनाचे निकष, मूल्यमापनाची पध्दती, साधने यांचे ज्ञान देणे, हे समान्यतः कथेच्या अध्यापनाचे उदिष्ट होय.

कथेच्या अभ्यासक्रमाचा आवाका व स्वरूप याची तपशीलवार मांडणी करणे योग्य ठरेल. कथेच्या अभ्यसक्रमाचे स्तराच्या दृष्टिने पदवीपूर्व व पदव्युत्तर असे दोन भाग कल्पिता येतील. एका वेळी एक साहित्यकृती म्हणजे एक कथाच अभ्यासावयाची असते. कथासंग्रह ही तशी पाहता कथेच्त्रा सादरीकरणाच्या दृष्टीने एक सोय, म्हणता येईल. मुळात एका वेळी आपण एका कथेलाच सामोरे जात असतो.

कथेच्या अध्यापनाचा आशय स्पष्ट करणे, अध्यापनाची सामुग्री सादर करणे, आवश्यक आहे. कथेच्या समग्र, सर्वांगीन अध्यापनासाठी कोणकोणत्या गोष्टीचे ज्ञान विद्यार्थ्यांना द्यावे लागेल याची नोंद आवश्यक असते. त्यात पुढील गोष्टीची निवड अभिप्रेत आहे. विद्यार्थ्यांच्या स्तराप्रमाणे / कक्षेप्रमाणे विशिष्ट गोष्टीचा केवळ विशिष्ट गोष्टीवर अधिक भर, काही गोष्टीचा केवळ स्थुलमानाने निर्देश, अशा प्रकारे अध्यापनाचा आशय किंवा सामग्री निश्चित करता येईल.

कथा या साहित्य प्रकाराचा तात्त्विक अंगाने विचार केला तर सथूल विवेचन कथनात्म, नाट्यात्म व भाषाकाव्यात्म या तीन प्रमुख वार्गांपैकी कथनात्मक वर्गातील (कथा, कादंबरी) साहित्य प्रकारांचा परिचय करून द्यावा लागेल. कथा या साहित्य प्रकाराची लक्षणे कथेचे मुलभूत घटक, कथानक, पात्र वातारवण, निवेदन, भाषा या सर्व घटकांची क्रमशः स्वरूपचर्चा याचे विवेचन कथेचे उपप्रकार, उनुभव स्वरूप, रचनाबंध, आकारमान या नुसार होणारे कथेचे वर्गीकरण उदा. ऐतिहासिक, पौराणीक, सामाजिक कथा, प्रादेशिक, ग्रामीण कथा, विज्ञान कथा, भयकथा, विनोदी कथा, लघुकथा, दीर्घकथा, इत्यादी कथेचे प्रकार अध्यापनाच्या सोईनुसार पाडले आहेत.

मराठी कथेच्या जडणघडणीचे विवेचन करतेवेळी मराठी कथेच्या स्थित्यंतराचा परामर्श घेणे गरजेचे ठरते. हरिभाऊ पूर्वकथा—हरिभाऊचीकथा—मनोरंजन कालखंड—दिवाकर कृष्णांची कथा—फडके खांडेकरांचे कथालेखन—नवकथेनंतरची वाटचाल—आजची मराठी कथा.

मराठी कथेच्या कथानक, पात्रचित्रण, निवेदन, भाषा इ. कथा घटकांच्या संकल्पनात कसकसे स्थित्यंतर होत गेले याचा परामर्श अपेक्षित आहे. कथेच्या ऐतिहासिक स्थित्यंतर क्रमाच्या या विवेचनाला मराठी वाङ्मयेतिहसाचा व्यापक संदर्भ असणे अपेक्षित आहे. अभ्यासक्रमाच्या स्वरूपानुसार कथेच्या अध्यापनाचा रोख अध्यापनाचे लक्ष्य निश्चित करताना अध्यापन सामग्रीतील विविध घटकांचे संतुलन साधने अध्यापनातील एकांगीपणा टाळणे, यात अध्यापकांच्या तारतम्याची कसोटी लागते. तसे पाहता विद्यार्थ्यांचा कथेशी अगदी बालपणपासून संबंध आलेला आसतो. परंतु बालपणी त्यांची गोष्टीशी ओळख झालेली असते. तरीही गोष्टीतील घटनाक्रमावर लक्षकेंद्रित करणे स्वभाविकपणेच त्यांना जमलेले असते.

कथेचा जाणकार वाचक घडविणे अभ्यासक समीक्षक म्हणून त्याच्या ठिकाणी क्षमता निर्माण करणे हे समान्यपणे आपण अध्यापनाचे

उदिष्ट मानले आहे. कथेच्या अध्यापनातील एक भाग कथेतील अनुभवार्थचे आकलन व मूल्यांकन हा होय. कथेच्या मुलघटकांची स्वरूपचर्चा करतांना तात्त्विक व ऐतिहासिक अशा दोन्ही अंगांनी परामर्श घेणे आवश्यक असते. कथानक, आणि गोष्ट यांच्यातील स्वरभेद करावा. कथानकातील अतार्किकतेची विविधरूपे स्पष्ट करावीत कार्यकारण भाव व कालानुक्रम या तत्वांच्या आधारे केलेली घटनांची संघटना म्हणजे कथानक, ही याचे विवेचन करावे निश्चित, स्वरूपाचा आरंभ व शेवट हेऊन पात्रे, त्यांचे हेतू व त्यांच्या कृती यांचे योजनाबध्द संघटन करून कथानकाची सिध्दी करावी लागते.

कथा हे नाव कथेला लाभले ते तिच्या कथात्मता या गुणधर्मामुळे, तेव्हा कथन किंवा निवेदन या घटकांच्या विवेचनाला कथेच्या अध्यापनात विशेष कहत्वाचे स्थान असावे, हे उघड आहे. निवेदनाविषयी विद्यार्थ्यांना मूल्यदृष्टी देताना कथेतील तृतीय पुरूषी निवेदक व लेखक नसतात. हे निदर्शनास आणून द्यावे लागते.

मुंबई सारख्या महानगरातील उच्च मध्यम वर्गातून आलेले विद्यार्थी असतात. तसेच, झोपडपट्टीमध्ये राहणारे, जगण्यासाठी हर तऱ्हेचे प्रयत्न करणारे आणि धडपड करूण शिक्षण घेणारे विद्यार्थीही बसलेले असतात. साहित्याचे हे जीवनभाष्य असते. हे भाष्य लेखकांने त्याच्या जीवनजाणीवेतून केलेले असते. समोर बसलेला विद्यार्थी समूह ह्यापेक्षा वेगळ्या जीवन जाणिवा घेऊन आलेला तर साहित्यकृतीतून साकार होणारे जीवनभाष्य आणि या विद्यार्थ्यांचे स्वतःचे जीवनविषक अनुभव यात एक प्रकारचा सांस्कृतिक दुरावा निर्माण होतो. यातुन ग्रहणप्रक्रियेत अडथळे येण्याची श्यक्यता असते.

मानवी जीवन आज साहित्याच्या अभ्यासाचा मुख्य विषय असल्यामुळे अध्यपन करताना या प्रकारच्या विविध समस्या निर्माण होतात. कथेचे अध्यापनही याला अपवाद नाही. साहित्याचे अध्यापन ऐकीकडे विद्याशाखीय असले तरी दुसरीकडे ते सामाजिक व्यापारशी बांधले गेलेले असते. साहित्याचे अध्यापन करताना अणि त्यातून विद्यार्थांना मूल्यदृष्टी देताना अध्यापकाला साहित्याच्या विशिष्टतेचे भान असने आवश्यक आसते.

### *कथेचे अध्यापन अधिक परिणामकारक होण्यासाठी पुढील गोष्टी महत्वाच्या आहेत.*

1. अध्यापकाला अध्यापनासाठी घेतलेल्या विषयाची आवड असावी लागते.
2. अध्यापकाकडे प्रस्तुत विषयाचे मुलभूत ज्ञान असावे लागते. आणि ते ज्ञान अद्ययावत आसावे लागते.
3. कथेचे अध्यापन म्हणजे शवविच्छेदन किंवा चिरफाड नसून ती एक रसास्वादाची चैतन्यमय प्रक्रिया आहे. या भूमिकेवर अध्यपकाने ठाम असावे लागते.
4. कथेचे अध्यापन समकालीन वाङ्मयीन, सामाजिक वातावरणाशी अनुबंध ठेवत करावे लागते. उदा. एखादी जुनी कथा शिकवताना नव्या कथेशी तुलना करून विद्यार्थांना सांगणे.
5. कथा शिकवताना ज्ञानसंक्रमणा ऐवढेच विद्यार्थाच्या मानवी मनावर मूल्यांचा संस्कार करणे आसश्यक असते याची जाणीव अध्यापकाला आसणे गरजेचे असते.
6. अध्यापकाचे व्यक्तिमत्त्व जितके समृध्द असेल तितक्या खोलात जाऊन त्यांना कथेचे वाङ्मयीन व सामाजिक संदर्भ उलगडून दाखवणे शक्य होते.

अशा प्रकारे कथेचे अध्यापन परिणामकारक होण्यास वरील बाबी म्हत्वाच्या ठरतात.

कथेच्या अध्यापनासंदर्भात पुढील उदिष्टे सांगता येतील.

1. कथेच्या माध्यतातून वेगवेगळया अनुभवांची व जीवनरूपांची विद्यार्थांना माहिती करून देणे.
2. विद्यार्थाची विचार प्रक्रिया धारधर बनविणे.
3. विद्यार्थाची सवंदना तीव्र करणे.
4. विद्यार्थ्यांची असवाद धारणा वाढविणे.
5. विद्यार्थ्यांची अभिरूची वृध्दींगत करणे.
6. विद्यार्थ्यांना वाङ्मयीन व सामाजिक परिर्वतनाचे भाण आणून देणे.
7. विद्यार्थ्यांची जीवन दृष्टी समृध बनविने.

अशा प्रकारे कथेच्या अध्यापनाचे उदिष्टे सांगता येतील.

कथेच्या अध्यापनाचे पुढील तीन दृष्टिकोन वापरणे शक्य आहे.

1. रुपवादी व कलावादी दृष्टिकोन याला 'वस्तु रुपाचा' अभ्यास म्हणता येईल.
2. वस्तुच्या निर्मिती मागील कारणे शोधणारा दृष्टिकोन.
3. 'कथा' या वाङ्मय प्रकारातील परिवर्तनाचा मागोवा घेणारा व नव्या शक्यतेच्या सूचना करणारा दृष्टिकोन.

अध्यापनासाठी घेतलेल्या कथेच्या घाटाचे आणि आशयाचे सौंदर्य विशद करून सांगितले पाहिजे. प्रसंगाची रचना, त्यातील संवाद–विरोध, कथाकराची शैली, भाषा सौंदर्य, वाक्यरचना, शब्दसंघटन कथेचे शीर्षक या सर्व बाबींकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले पाहिजे.

कथेचे विविध प्रकार व धाटण्या उदा. रुपककथा, ललितगद्य–सदृश्य कथा, आत्मनिवेदनात्मक कथा यांचा विचार वस्तुरूपाच्या अभ्यासामध्ये येतो. 'मृणालिणीचे लचवण्य' ही दीवाकर कृष्णांची कथा भावरम्य आहे. बाज वैचारीक आहे. कथेच्या अशा विविध धाटण्यांचा परिचय आणि त्यातील सौंदर्यस्थाने कथेच्या अध्यापनात अध्यपकाने सांगायला हवीत.

एखादी कथा अशी का आहे? या कथेच्या निर्मिती मागील शोध घेणे ही अध्यापनाची दुसरी पध्दती होय. आधुनिक मराठी कथेला शंभर सव्वाशे वर्षाची परंपरा आहे. कथाकार या परंपरेतच लिहित असतो. हरिभाऊ कालीन कथा तशी का? नवकथोत्तर कथा अशी का आहे.? या सर्व प्रश्नांची उत्तरे परंपरेच्या संदर्भातच देता येतील.

'भागलेला चांदोबा', या कथेत गंगाधर गाडगिळांनी पुरूषप्रधन कुटुबं व्यवस्थेत दबल्या गेलेल्या एका स्त्रीचे दुःख रंगवलेले आहे. कथा तिच्या उत्कर्ष बिंदूकडे मोठ्या ताकदीने जाते. गाडीत सहप्रवाशी असलेल्या एका विधवा पण आत्मनिर्भर नर्सकडे बघून. आपण

तिच्यासारखे असतो तर किती बरे झाले असते. नवऱ्याच्या सहवासात बसलेल्या त्या स्त्रीला क्षणभर वाटूणजाणे हे 'वाटणे' विद्यार्थ्यांनांही स्वाभविक वाटायला लावणे व त्यासाठी समाज व्यस्थेतील स्त्रीच्या स्थानाची चिकित्सा करणे ही अध्यापकाची जबाबदारी असते. सामाजिककरणातील अडथळे ओलांडून आदर्शांकडें जाण्याच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक प्रवासात अध्यायपक हा अशा प्रकारे मार्गदर्शक असतो. दलित कथेतील अनुभवांशी सहकंप होण्यासाठी उच्चवर्गातील विद्यार्थ्यांना उलट्या दिशेने घेऊन जावे लागते. दरिद्र्य, विषमता, जातिभेद या भारतीय सामाजाला लागलेल्या रोगाविषयी विद्यार्थ्यांच्या मनात चीड निर्माण होणे रसास्वादासाठी आवश्यक असते. विद्यार्थ्यांमध्ये मानसिक संक्रमण न घडवता केवळ कथेच्या रुपबंधावरच वर्गातून शाब्दिक खल होत असेल. तर ते कथेवर अन्याय करणारे आहे. इतकेच नव्हे तर साहित्याच्या अध्यापनाचा हेतू पराभूत करणारा आहे.

वर्गामध्ये जे शिकले गेले आहे. यापेक्षा अधिक वाचायला विद्यार्थ्यांला प्रवृत करणे हे अध्यापकाचे कतर्व्य आहे. वर्गामध्ये जी कथा शिकवली जात आहे. त्याची नावे विद्यार्थ्यांना देणे गरजेचे असते. समीक्षकांबदल पदवीपूर्व व पदव्युत्तर वर्गात विद्यार्थ्यांच्या गटचर्चा आयोजित करता येतात. अशा गटचर्चामुळे विद्यार्थ्यांची चिकित्सक वृती आणि समीक्षा दृष्टी विकसित होते. आत्मविश्वास वाढतो.

शिक्षण व्यवस्था ही समाजव्यवस्थेचाच एक भाग असल्यामुळे समाजात जे दोष असतात. ते शिक्षण व्यवस्थेत ही शिरलेले असतात. वर्गात शंभर सव्वाशे विद्यार्थी असतील तर सार्वांचा बुध्द्यांक सारखा नसतो. हे अध्यापकाने लक्षात घेऊन कथा शिकवावी लागते. अशा परिस्थितीत कथेतील विषयाची सुक्ष्ममांडणी करता येत नाही. तसेच विद्यार्थ्यांकडून चर्चात्मक सहभागाची अपेक्षाही ठेवता येत नाही. एखादेवेळी एखदा दुय्यम दर्जाचा कथसंग्रह अभ्यासक्रमास लावला गेला तरी नाकारात्मक दृष्टिकोन ठेऊन कथा शिकवायच्या नसून त्या उलट एखद्या चांगल्या कथासंग्रहाशी त्याची तुलना करून कथेच्या सामर्थ्य–मर्यादा विद्यार्थ्यांसमोर अधिक चांगल्या पध्दतीने आणता येतात.

अशा प्रकारे अध्यापकाने सर्व अडचणीवर मात करून विद्यार्थ्यांवर मूल्यसंस्कार करायचे असतात. श्रेंष्ठ साहित्यचा जन्म सदोष समाज व्यवस्थेत मूल्यसंवर्धन व नव्या समकालीन मूल्यांची निर्मीती करण्यासाठी झालेला असतो. साहित्य हे समाजपरिवर्तनाचे साधन असते. याची जाणीव साहित्याच्या अध्ययपकाने सतत ठेवली पाहिजे. देशाचे भवितव्य म्हणजे विद्यार्थी असतात. भावी समाज सुशिक्षित, सुसंस्कृत घडवायचा असेल तर त्याची फारमोठी जबाबदारी साहित्याच्या अध्यापकावर येऊन पडते. ती जबाबदारी साहित्याच्या अध्यापकाद्वारे पार पाडावी लागते. अध्यापक ती कथेच्या अध्यापनाच्या माध्यमातून यशस्वीरित्या पार पाडू शकतो. करीता कथेच्या अध्यापनाचे महत्त्व अनन्य साधरण आहे.

### संदर्भग्रंथसूची

1) पुंडे द.दि. वाङ्मयाचे अध्यापन – (मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे)
2) सोमण, अंजली मराठी कथेची स्थितीगती – (प्रतिमा प्रकाशन, पुणे)
3) मुलाटे, वासुदेव ग्रामीण कथा स्वरूप आणि विकास –(साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद)
4) शेवडे, इंदुमती मराठी कथा उगम आणि विकास – (सोमय्या पब्लिकेशन प्रा.लि. मुंबई)
5) जोगळेकर, गं.ना. मराठी वाङ्मयचा अभिनव इतिहास–(स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे)
6) जोगळेकर, शं.गो. मराठी वाङ्मयचा इतिहास – (महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे)

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org